ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १८ पुणें, बुधवार तारीख १७ सप्टेंबर, १९५२ अंक १८

## विविध माहिती

**नांगरटीसाठी हत्तींचा उपयोग**—उत्तर प्रदेश सरकारनें जंगलांतील १०० एकर जमीन हत्तींना ट्रॅक्टर्स ओढण्यास लावून नांगरण्याचें ठरविलें आहे. राज्याच्या जंगल खात्याजवळ ह्या कामी उपयोगी पडण्यासारखे ३० शिकविलेले हत्ती आहेत. हत्तींना ट्रॅक्टर्सना जुंपण्यासाठी विशेष प्रकारच्या साखळ्या वापरण्यांत येणार आहेत.

**इलेक्ट्रॉन मायक्रॉस्कोप**—बंगलोर येथील शास्त्रीय संशोधन संस्थेंत एक इलेक्ट्रॉन मायक्रॉस्कोप बसविण्यांत आला आहे. त्याचा उपयोग धातुविषयक संशोधनासाठी करण्यांत येणार आहे. भारतांत अशा प्रकारचा मायक्रॉस्कोप प्रथमच वापरण्यांत येत आहे. त्याची किंमत सुमारें ७५,००० रुपये आहे.

**रशिअन संशोधकाचा मृत्यु**— भारतासंबंधीं निरनिराळ्या विषयावर सुमारें २०० पुस्तकें लिहिणारे रशिअन ग्रंथकार मि. बॅरनिकॉव्ह आपल्या वयाच्या ६३ व्या वर्षीं नुकतेंच निधन पावले. त्यांनीं भारतीय वाङ्मय, इतिहास आणि संस्कृति ह्यासंबंधीं ग्रंथ लिहिले होते अलीकडे त्यांनीं रामायणाचें रशिअन भाषेंत भाषांतर प्रसिद्ध केलें होतें.

**महारोगविषयक शिक्षण**— गेल्या कांहीं वर्षांत जपानी डॉक्टरांनीं त्यांच्या देशांतील महारोग्यांची संख्या बरीच कमी केलेली आहे. त्यांच्या ह्या रोगाच्या उपचारपद्धतीचा अभ्यास करण्यासाठी कांहीं भारतीय डॉक्टर्स जपानला जाणार आहेत असें समजतें. पं. नेहरूंनीं ह्या बाबतींत लक्ष घातलें होतें.

**कलकत्ता विद्यापीठाला देणगी**— भारतामधील रशिअन वकिलातीनें कलकत्ता विद्यापीठाला ३५० पुस्तकें भेटीदाखल दिलीं आहेत. ह्या पुस्तकांत रशिअन वाङ्मय आणि शास्त्रीय पुस्तकें असून महाभारताच्या आदिपर्वाच्या रशिअन भाषांतराची एक प्रतहि आहे.

**मध्यप्रदेशांतील उसाची लागवड**—१९५१–५२ साला मध्यप्रदेशांत उसाखालील लागवडीची एकूण जमीन अंदाजें ४३,२१० एकर होती. मागील सालीं ४६,५६० एकर जमीन उसाखालीं होती. १९५१–५२ सालीं सुमारें ५२,५४० टन गूळ निर्माण करण्यांत आला. त्याची किंमत २११ लाख रुपये झाली.

**भारतांत जपानी भाषेची शाळा**—जपानच्या परराष्ट्रीय खात्यानें आग्नेय आशिआ आणि भारत ह्यांच्याशीं सांस्कृतिक संबंध वाढविण्यासाठीं २,५०,००० पौंड खर्च करण्याचें ठरविलें आहे. ह्यासाठीं भारत, पाकिस्तान आणि सयाम ह्या देशांतून जपानी भाषा शिकविण्याच्या शाळा काढण्यांत येणार आहेत.

**उत्पादन वाढविण्याची स्पर्धा**—येत्या ५ ऑक्टोबरला रशिआंतील कम्युनिस्ट पक्षाची कॉंग्रेस भरणार आहे. ह्या प्रसंगाच्या निमित्तानें सोव्हिएट ट्रेड युनिअन कौन्सिलनें सर्व देशभर उत्पादनाच्या स्पर्धा लावण्याचा कार्यक्रम आंखला आहे.

**सिंद्री येथील कारखान्याचें उत्पादन**— ऑगस्टच्या तिसऱ्या आठवड्यांत सिंद्री येथील खताच्या कारखान्यांतील अमोनिअम सल्फेटचें उत्पादन रोज ४०० टनांपर्यंत वाढलें होतें. चालू वर्षाच्या अखेरीस रोज १,००० टन उत्पादन करण्याचा संकल्प आहे. आतांपर्यंत कारखान्यांत ८८,२९५ टन खत तयार झालें आहे.

**हैदराबाद राज्यांतील अन्नधान्याची शेती**—१९४९–५० सालापेक्षा १९५२ सालीं हैदराबाद राज्यांतील अन्नधान्यांच्या लागवडीखालीं असलेल्या जमिनींत १२ लाख एकरांची वाढ झाली, असें समजतें. 'अधिक धान्य पिकवा' मोहिमेचें हें फळ असून, एकूण अन्नधान्याच्या उत्पादनांत १·३७ लाख टन वाढ झाली.

**हवामानाचें वृत्त**—मुंबई येथील सांताक्रूझ विमानतळावरून प्रक्षेपित करण्यांत येणाऱ्या हवामानविषयक अंदाजाचा उपयोग भारत व पाकिस्तानच्या पश्चिमेस २,५०० मैलांपर्यंत संचार करणाऱ्या विमानांना होतो. दिल्ली, कराची, मुंबई, अहमदाबाद, जोधपूर, भूज व अलाहाबाद इतक्या विमानतळांवरील हवामान दर तीन तासांनीं प्रक्षेपित करण्यांत येत असतें.

**संशोधनासाठीं स्विस उंदीर**– लखनौ येथील सेंट्रल ड्रग रिसर्च इन्स्टिट्यूटला स्वित्झरलंडमधील एका प्रयोगशाळेकडून १५ पांढरे उंदीर प्रयोग करण्यासाठी मिळाले आहेत. ह्या उंदरांचें पार्सल नुकतेंच विमानानें मुंबईला आणण्यांत आलें. उंदीर अस्सल स्विस अवलादीचे आहेत.

**नव्या ट्रॅन्समिटर्सचा खर्च**—ऑल इंडिआ रेडिओनें १०० किलोवॅट शक्तीचे तीन नवे ट्रॅन्समिटर्स मागविले आहेत, त्या सर्वांना मिळून २५ लाख रुपये खर्च येईल. ते मुंबई, मद्रास आणि कलकत्ता ह्या ठिकाणीं बसविण्यांत येणार आहेत.

**पं. नेहरूंना भेट**—बर्लिन येथील जर्मन एशिॲटिक सोसायटीच्या कलावंत मिसेस मागरेट उंमर ह्यांनीं पं. जवाहरलाल नेहरू ह्यांच्या दिवंगत पत्नीचें तैलचित्र तयार करून तें सोसायटीतर्फे त्यांना नुकतेंच अर्पण केलें. वरील संस्था गेल्या महायुद्धांत जे जर्मन लोक भारतांत राहिले होते, त्यांनीं काढलेली आहे.

### भारतामधील विजेच्या पंख्यांचें उत्पादन वाढलें

विजेच्या पंख्यांच्या धंद्यानें गेल्या कांहीं वर्षांत खूप प्रगति केली असून भारत आतां ह्या बाबतींत स्वयंपूर्ण झाला आहे. भारतांत दरवर्षी २,७८,००० पंखे तयार होऊं शकतील. प्रत्यक्ष उत्पादन मात्र १९५० सालीं १,९३,७९९ पंखे आणि १९५१ सालच्या पहिल्या सहा महिन्यांत १,१२,९१२ पंखे असें झालें. छताला लावण्याचे १,४०,०००, टेबलावर ठेवण्याचे ६०,००० आणि रेल्वेच्या डब्यांत बसविण्यासाठी १२,००० पंखे दरवर्षी लागतात, असा अंदाज करण्यांत आला आहे. १९५४ अखेर २,७०,००० पंख्यांची गरज लागेल. गेल्या दोन वर्षांत उत्पादन-क्षमतेच्या मानानें ७० ते ८० टक्केच उत्पादन झालें. ह्याचें कारण कच्च्या मालाचा तुटवडा हें प्रामुख्यानें आहे. १९३६–३७ ते १९३८–३९ ह्या तीन वर्षांत भारतानें दरवर्षी सरासरी ३० लाख रुपयांचे पंखे आयात केले. १९४८–४९ ते १९५०–५१ ह्या वर्षांत आयात केलेल्या पंख्यांची सरासरी किंमत फक्त ४ लाख रुपये आहे. भारत आतां विजेचे पंखे आसपासच्या देशांना निर्यातहि करूं लागला आहे.

---

### युनायटेड नेशन्सची वर्गणी

भारत युनायटेड नेशन्सच्या एकूण खर्चापैकी ३·४५% खर्चा-इतकी वर्गणी देतो. त्यांत १९५३ सालाकरितां ०·०८% घट होणार आहे. १९५३ चें अंदाजपत्रक ४,७७,६५,२०० डॉलर्सचें आहे. प्रत्येक देशाची वर्गणी ठरवितांना तीन गोष्टींचा विचार केला जातो:—त्या देशांतील दरमाणशीं उत्पन्न, जागतिक युद्धामुळें झालेल्या तात्पुरत्या अडचणी आणि परराष्ट्रीय हुंडणावळ मिळविण्याची शक्यता. अमेरिकेची वर्गणी एकूण खर्चाच्या ३५·१२% असेल. रशियन गटाच्या सर्व देशांच्या वर्गणींत वाढ सुचविण्यांत आली आहे. रशियाची वर्गणी १२·२८%, म्हणजे पूर्वीपेक्षा २·४३% ज्यास्त होईल. वर्गणी ठरविणाऱ्या कमिटीच्या ह्या शिफारसी जनरल असेंब्लीकडे मंजुरीसाठी जातील.

---

### तिसरा भागीदार !

"तेलाचें उत्पादन, शुद्धीकरण व विक्री ह्यांसाठीं आपण २२,००० स्त्री–पुरुषांना काम देतों. आपल्या भागीदारांची संख्या ४६,००० आहे. म्हणजे, यंत्रसामुग्री आणि भांडवल पुरविणारांची संख्या अक्कल आणि कष्ट पुरविणारांच्या दुप्पट आहे. हल्ली धंद्यांत तिसरा एक भागीदार घुसला आहे. तो म्हणजे सरकार. हा भागीदार भांडवलहि पुरवीत नाहीं आणि कष्टहि करीत नाहीं, पण त्यानें १९५१ च्या नफ्यापैकीं ५८% नफा उचलला !" बर्मा ऑईल कं. चे चेअरमन, सर केनेथ बी. हार्पर.

---

### सर स्टॅफर्ड क्रिप्स

सर स्टॅफर्ड क्रिप्स ह्यांची यशस्वी वकील म्हणून प्रसिद्धि होती व त्यांत त्यांना एकेकाळीं दरसाल ४,५०,००० रुपयांवर प्राप्ति होत असे. परंतु, त्यांच्या मृत्यूनंतर त्यांनीं फक्त २ लक्ष रुपयेच ठेवले आहेत. सर स्टॅफर्ड हे स्वतःसाठी फार थोडा खर्च करीत असत; इतरांना त्यांनीं पुष्कळ मदत केली त्यामुळें त्यांची पुंजी साठली नाहीं.

---

### आर्थिक जीवनांत स्त्रियांचें स्थान

अमेरिकेंतील १,००० मोठ्या कंपन्यांच्या भागीदारांपैकीं ५२% भागीदार स्त्रिया आहेत. म्युच्युअल सेव्हिंग्ज बँकांच्या खातेदारांपैकीं ६५% खातीं स्त्रियांचीं आहेत. अमेरिकेंतील ३,०१,००,००० घरांपैकीं ४०% घरांची मालकी स्त्रियांकडे आहे व मालमत्तेवरील करापैकीं ४०% कर स्त्रियाच भरतात.


## ठेवी स्वीकारण्यांत येतात

ठेवींवर दरसाल दर शेंकडा ७½ रुपये व्याज दिलें जातें. व्याज दर तीन महिन्यांनीं दिलें जातें. ठेवीदारास ठेवीची मुदत संपण्यापूर्वी आपली रक्कम परत पाहिजे असल्यास एक महिन्याच्या आगाऊ नोटिसीनें केव्हांही व्याजासह परत मिळूं शकते.

**पेडणेकर आणि कंपनी लिमिटेड**

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी,
१७२, गिरगांव रोड, मुंबई ४
टेलिफोन २२७३८ तारेचा पत्ता: 'PEDNECO' Bombay

## दि सांगली बँक लिमिटेड

**सांगली**

( स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक )

**मुख्य ऑफिस : सांगली**

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रुपये १०,००,००० |
| वसूल भांडवल | रुपये ४,५०,००० |
| रिझर्व व फंडस् | रुपये ४,५०,००० |
| वर्किंग फंडस् | रुपये एक कोटी |

: शाखा :
मुंबई, शहापूर, तेरदळ, रबकवी, शिरहट्टी, मंगळवेढें, कवठें, कराड, उगार, विलिंग्डन कॉलेज.

सांगली येथें सेफ् डिपॉझिट व्हॉल्टची व्यवस्था आहे.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. एस्. ई. सुलटणकर, D. F. C., I. A. S. (चेअरमन) कलेक्टर, साउथ सातारा.
(१) श्री. नेमचंद रावजी शहा (२) श्री. भूपालराव अनंत आरवाडे (३) श्री. पुरुषोत्तम गोकुळदास, (४) श्री. गुंडप्पा व बाजी आरवाडे, (५) श्री. शांतीनाथ बाबुराव आरवाडे, B. A., (६) श्री. मारुतीराव रामचंद्र जाधव.

एम्. के. गुप्ते,
एम्. ए., सी. ए. आय. आय. बी.
मॅनेजर



# अर्थ

बुधवार, ता. १७ सप्टेंबर, १९५२





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे.
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## जागतिक बँकेची भारताला मदत

इंटरनॅशनल बँक फॉर रीकन्स्ट्रक्शन अँड डेव्हलपमेंट ह्या संस्थेनें आपला वार्षिक अहवाल बोर्ड ऑफ गव्हर्नर्सना नुकताच सादर केला आहे. भारताच्या इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशनला जागतिक बँकेकडून कर्ज मिळण्याविषयींच्या वाटाघाटी लवकरच सुरू होतील, असें ह्या अहवालांत जाहीर करण्यांत आलें आहे. १९५२ च्या मे महिन्यांत बँकेच्या प्रतिनिधींनीं कॉर्पोरेशनशीं ह्यासंबंधीं वाटाघाटी केल्या होत्या. मध्यम मुदतीचीं व दीर्घ मुदतीचीं कर्जे उद्योगधंद्यांना देणें हा कॉर्पोरेशनचा हेतु आहे

जागतिक बँकेनें भारताला केलेल्या मदतीसंबंधीं अहवालांत पुढीलप्रमाणें माहिती सांपडते. बँकेनें एकूण ३.४ कोटी डॉलर्स कर्ज दिलें होतें. त्यापैकीं बहुतेक रक्कम रेल्वेएंजिनांच्या खरेदीवर खर्च झालेली आहे. रेल्वेचीं वाढलेली भाडीं आणि कार्यक्षमता ह्या दोन कारणांनीं भारतीय रेल्वेची आर्थिक परिस्थिति बरीच सुधारली आहे भारतीय सरकारच्या सेंट्रल ट्रॅक्टर ऑर्गनायझेशनला कर्ज देण्यांत आलें होतें. मध्य-भारतामधील पडीक जमिनींत उगवणाऱ्या कान्स जातीच्या गवताचें उच्चाटन करण्यासाठीं ह्या कर्जाचा उपयोग करण्यांत आला. त्याशिवाय उत्तर भारतामधील जंगलें साफ करून तीं जमीन लागवडीखालीं आणण्यालाही ह्याच कर्जातून मदत देण्यांत आली. मध्य-भारतांत ५,००,००० एकर जमीन कान्स गवतापासून मुक्त करण्यांत आली. १९५१-५२ सालीं ठरविण्यांत आलेल्या २,१०,००० एकर जमिनीपेक्षांही अधिक जमीन वरील प्रकारच्या गवतापासून मुक्त करण्यांत आली. जंगल साफ करण्याचें कार्य मुख्यत: हिमालयाच्या पायथ्याशीं करण्यांत आलें. अशा तऱ्हेनें १८००० एकर जमीन लागवडीसाठी योग्य करण्यांत आली. यांत्रिक अवजारांचा उपयोग करून भारतामधील जंगलें साफ करतां येतात, हें ह्यावरून सिद्धच झालें

दामोदर-खोरें योजनेंतील बोकॅरो येथील वीज-निर्मितीचें पहिलें केंद्र १९५२ च्या नोव्हेंबरमध्यें चालू होईल व सर्व केंद्र पद्धति मार्च १९५३ मध्यें पूर्ण होईल, असा अंदाज आहे. सर्व केंद्रांत मिळून ३,५०,००० किलोवॅट वीज निर्माण होईल. भारताच्या पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमाची आखणी, त्याला लागणारा पैसा आणि त्याची कार्यपद्धति ह्यासंबंधीं प्रत्यक्ष माहिती करून घेण्यासाठी बँकेचें एक प्रतिनिधिमंडळ १९५१ सालीं भारतांत आलें होतें. कार्यक्रमापैकीं कांहीं कामांना कर्ज देण्याची तयारी बँकेनें दाखविली आहे. ज्या कामांना मदत द्यावयाची त्यांची तपशीलवार माहिती मिळविण्यासाठी बरीच तज्ज्ञांचीं मंडळें भारतांत आलीं होतीं. दामोदर नदीच्या खोऱ्यांत वीज उत्पादन करण्याची जी योजना आखली आहे तिचा परिचय करून घेण्यासाठीं बँकेचा एक प्रतिनिधि १९५२ च्या जून मध्यें भारताला गेला होता. भारताच्या लोखंडाच्या व पोलादाच्या धंद्यांतील तांत्रिक प्रश्नांची माहिती करून घेण्यासाठींहि एक प्रतिनिधी-मंडळ भारतांत आलें होतें. ह्या मंडळांत जागतिक बँकेचा एक प्रतिनिधि आणि न्यूयॉर्क येथील बोस्टन कॉर्पोरेशनचे अध्यक्ष हे दोघे होते. भारताच्या लोखंडाचें व पोलादाचें उत्पादन वाढविण्यासाठी बँकेला काय व कशी मदत करतां येईल हें अजमावून पहाण्याचा मंडळाचा इरादा होता. हें मंडळहि भारतांत १९५२ च्या जूनमध्येंच आलें होतें.

---

## ग्रेटब्रिटनमधील जीवनावर प्रकाश

### १९५१ च्या शिरगणतीचा निष्कर्ष

ग्रेटब्रिटनमधील नागरिकांत म्हाताऱ्यांचें प्रमाण वाढत आहे, त्याचें कारण लोक दीर्घायु होत चालले आहेत. लोकांचें आयुष्य वाढत चाललें असलें, तरी ते विवाह मात्र पूर्वीपेक्षां लवकर करीत आहेत. २० ते २४ वर्षांच्या दरम्यानच्या वयांत विवाह करणाऱ्या स्त्रियांचें प्रमाण गेल्या वीस वर्षांत दुप्पट झालें आहे. लोकांना रहाण्यास जागा मिळणें अवघड झालें असलें तरी त्यामुळें विवाह अडून रहात नाहींत पुरुषांपेक्षां स्त्रिया ज्यास्त वर्षें जगतात. ६५ वर्षांवरील प्रत्येक ५ लोकांत ३ स्त्रिया असतात. युद्धकाळांत व त्यानंतर मुलींपेक्षां मुलगे ज्यास्त जन्मले. बहुतेक लोक स्वत:पेक्षां कमी वयाची वधू पसंत करतात, ही कल्पना खोटी आहे; १२½ लक्ष नवऱ्यांच्या बायका वयानें नवऱ्यापेक्षां मोठ्या आहेत. घटस्फोट घेतलेले जितके पुरुष पुन: विवाह करतात, तितक्या स्त्रिया करीत नाहींत. दर १,००० कामगारांत ४४२ स्त्रिया आहेत. कारकून व टाइपिस्ट ह्यांचें काम करणाऱ्या स्त्रियांची संख्या दुप्पट झाली आहे, तर मोलकरणींची संख्या निम्म्यावर आली आहे. दुकानांतील स्त्री-विक्रेत्यांची संख्या १,३०,००० नें वाढली आहे; पुरुष-विक्रेते त्यापेक्षां मोठ्या संख्येनें कमी झाले आहेत. १९३१ सालीं प्रत्येक १०० विवाहित स्त्रियांपैकीं १० स्त्रिया बाहेर कामावर जात होत्या; आतां २० स्त्रिया जातात.

---

## स्टालिनचें आयुष्य वाढविण्यासाठी प्रयोग

मार्शल स्टालिनचें आयुष्य कसें वाढवितां येईल ह्याबाबत आठ रशियन शास्त्रज्ञ प्रयोग करीत आहत, असें वृत्त प्रसिद्ध झालें आहे. १९३८ सालापासून हे प्रयोग चालू आहेत. स्टालिनच्या वयाच (७२ वर्षें) व त्यांच्या शारीरिक प्रकारचे सुमारें ७० पुरुष कीव्ह येथील प्रयोगशाळेंत ठेवलेले असून, त्यांना स्टालिनच्या रहाणीसारखें रहावयास लावलें जातें व दीर्घायुषी करणारीं द्रव्यें त्यांचेंत टोंचण्यांत येतात आणि त्यांच्या परिणामांचा अभ्यास केला जातो.

---

## मॅक आर्थर : रेमिंग्टन कंपनीचे चेअरमन

जनरल मॅक आर्थर गेल्या महिन्यांत रेमिंग्टन कंपनीचे चेअरमन झाले. ह्या कंपनीचा वार्षिक खप एक अब्ज रुपयांपेक्षां जास्त आहे कंपनीचें अमेरिकेंत २२ व इतर देशांत २३ कारखाने आहेत. मॅक आर्थरला वार्षिक वेतन ५ लक्ष रुपये मिळेल. लष्करी खात्याकडून त्यांना १ लक्ष रुपये मिळतील ते वेगळेंच.

### विहारमधील विजेचें नवीन केंद्र

विहारच्या सरकारनें उत्तर-विहारमधील ऊंस पिकणाऱ्या भागांत वीज-निर्मितीचीं सहा केंद्रें बांधण्याचें ठरविलें आहे. त्यांपैकीं बेटिआ येथील वीज-निर्मिति-केंद्राचा उद्घाटन समारंभ राज्याचे एक मंत्री श्री. रामचरित्र सिंग ह्यांच्या हस्तें नुकताच झाला. गंडकी नदीच्या खोऱ्यांत १०० ट्यूब विहिरी खोदण्यास सरकारनें मंजुरी दिली आहे. उसाच्या लागवडीचा विकास करण्यासाठी ह्या विहिरींचा उपयोग करण्यांत येणार आहे राज्यसरकारनें संकल्पिलेल्या ६ वीज-निर्मिती-केंद्रांत मिळून ४,००० किलोवॅट वीज निर्माण होईल आणि उत्पादन होणाऱ्या विजेचा पुरवठा विहिरींना करण्यांत येईल. त्याशिवाय ८ मोठीं गांवें आणि १८ छोटीं गांवें ह्यांनाही वीज पुरवता येईल. उत्तर बिहारसाठी पाणीपुरवठा व वीज ह्यांची सोय करण्याच्या हेतूनें वरील योजना आखण्यांत आली असून तीसाठी जवळ जवळ २३/४ कोटी रुपये खर्च येईल. उत्तर बिहारमध्यें लोकवस्ती दाट असल्यानें तेथें विकासयोजना हातीं घेणें अधिक निकडीचें झालें आहे. बेटिआ येथील केंद्राचें उद्घाटन करतांना श्री. सिंग म्हणाले कीं उत्तर बिहारमध्य वीज खेळविण्याच्या सरकाच्या योजनेंतील पहिलें पाऊल बेटिआ वीज-निर्मितीच्या केंद्रांच्या रूपानें टाकण्यांत आलें आहे. आणखीही कांहीं योजना सरकारच्या दप्तरीं असून त्या अंमलांत आल्यावर विहारमधील शेतीच्या व्यवसायाला चांगली चालना मिळेल. संकल्पिलेलीं विजेचीं सहा केंद्रें अशा तऱ्हेनें बांधण्यांत येणार आहेत कीं, थोडयाशा अधिक खर्चानें त्यांची वीज निर्माण करण्याची शक्ति आणखी वाढवितां येईल.

---

### पंजाबमधील ट्यूब विहिरी

पंजाबांत ट्यूब वेल्स खोदण्याची खूप मोठी मोहीम चालू करण्यांत आली आहे. जगांत अशा प्रकारची एवढी मोहीम ही एकच आहे असें म्हणतात उत्तर-प्रदेश, बिहार आणि पंजाब ह्या राज्यांत मिळून ९६५ विहिरी खोदण्याचें काम एका ब्रिटिश कंपनीला देण्यांत आलें आहे. पुढील वर्षीं लवकरच हा कार्यक्रम पुरा होईल असा भरंवसा त्या कंपनीला वाटत आहे. आतांपर्यंत कंपनीनें ३/४ विहिरी खोदून पुऱ्या केल्या आहेत. पंजाबमधील अंबाला आणि कर्नाळ जिल्ह्यांत २२५ ट्यूब विहिरी खोदण्यांत यावयाच्या आहेत. त्या खोदण्यासाठीं सुमारें १३० लाख रुपये खर्च येईल. ह्या भागांत दलदलीमध्यें सांचलेलें पाणी काढून लावण्याचे कामच मुख्यत: करावयाचें आहे. त्यामुळें बऱ्याच विहिरींतील पाणी खेचून तें यमुनेच्या कालव्यांत सोडावें लागेल. ह्या उपसलेल्या पाण्यामुळें कालव्याचें पाणी वाढून रोहटक आणि हिसार जिल्ह्यांना अधिक चांगला पाणी-पुरवठा होईल. पाऊस पुरेसा न पडल्यास ह्या भागाला अवर्षणाचा धोका नेहमींच असतो उत्तर प्रदेशांत खोदल्या जाणाऱ्या विहिरी मात्र जमिनींत खोल मुरलेलें पाणी उपसण्यासाठी खोदण्यांत यावयाच्या नाहींत. त्या शेतीला पाणी-पुरवठा करण्यासाठींच खोदल्या जावयाच्या आहेत. ट्यूब विहिरींच्या ह्या कार्यक्रमाची पहाणी करण्यासाठी मध्यवर्ती सरकारचे शेतकी मंत्री डॉ. पंजाबराव देशमुख नुकतेच पंजाबच्या दौऱ्यावर गेले होते. कर्नाळ येथें एक गुरांचें व शेतकीचें केंद्रहि सरकारतर्फे चालविण्यांत येतें. ह्या मोठ्या शेतांत सुमारें २,००० एकर जमिनीचा अंतर्भाव आहे. ह्या केंद्रालाहि डॉ. देशमुख ह्यांनीं भेट दिली.

**जनता सहकारी बँक लि., पुणें.**

ह्या बँकेची स्थापनेपासून एकसारखी प्रगति होत गेली आहे. १९५०-५१ मध्यें ३६६ रु. नफा झाला होता, तो १९५१-५२ मध्यें १,७८५ रु. झाला. बँकेकडील कर्जवसुली समाधानकारक असून बुडीत व्यवहार एकहि नाहीं, ही अत्यंत अभिनंदनीय गोष्ट आहे. बँकेनें हप्तेबंद ठेवीच्या ( रिकरिंग डिपॉझिट ) योजनेस सुरवात केली आहे. 'सहकारी वैयक्तीय मदत' योजनेचें उद्दिष्ट चालकांनीं स्वत:पुढें ठेवलें आहे, आणि त्यासाठी बँकेची भरभराट आधी करण्याचें धोरण आहे. बँकेस 'अ' वर्ग मिळाला आहे. निवृत्त डायरेक्टरांच्या जागीं नव्या डायरेक्टरांची निवडणूक बिनविरोध झाली, हें लक्षण बँकेच्या प्रगतीस पोषकच आहे. ( अध्यक्ष : त्र्यं. व्यं. कुलकर्णी, बी. ए., एलूएल्. बी. चेअरमन : मा. ग. दीक्षित, बी. एस्सी., बी ई., ए. एम्. आय. ई अधिकृत डायरेक्टर : द. शं. जमदग्नि ).

---

**सातारा जिल्हा को-ऑपरेटिव्ह लँड मॉर्गेज बँक लि.**
**कराड व सांगली**

## भागीदारांस नोटीस

बँकेच्या भागीदारांची सतरावी वार्षिक साधारण सभा शनिवार ता. २७-९-५२ रोजीं दुपारीं ३ वाजतां बँकेच्या कराड ऑफिसमध्यें भरणार आहे. सदर सभेंत सन १९५१-५२ चा अहवाल, ताळेबंद व नफातोटा पत्रक मंजूर करणें, नियमाप्रमाणें डायरेक्टर्सची निवडणूक जाहीर करणें, ऑडिटर्सचीं नेमणूक व त्यांचें वेतन ठरविणें, वगैरे कामें केलीं जातील. तरी बँकेच्या सर्व सभासदांनीं येण्याचें करावें अशी विनंति आहे.

आण्णापा नारायण कल्याणी
चेअरमन.

कराड, ३१-८-५२.

---

**श्रीलक्ष्मी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. फलटण**

## प्रकट सूचना

बँकेची सव्विसावी वार्षिक साधारण सभा मंगळवार दि. ३० सप्टेंबर १९५२ या दिवशीं दुपारीं ३-३० वा. फलटण येथें बँकेच्या कचेरीमधील दिवाणखान्यांत भरणार आहे. सभेत खालील कामें करण्यांत येतील:—

दि. ३०-९-१९५१ च्या वार्षिक सभेचा व दि. २२-६-५२ च्या विशेष सा. सभेचा वृत्तांत कायम करणें; ( २ ) हिशेब तपासनीस यांचे तपासणीयादीचा विचार ( ३ ) दि. ३० ६-१९५२ ला संपलेल्या वर्षाबद्दल प्रतिवृत्त, ताळेबंद-पत्रकें व नफा वाटणी याचा विचार ( ४ ) भागीदारांना वाटावयाचा नफा प्रकट करणें. ( ५ ) सोनेचांदी व माल तारणाचे नियम पसंत करणें. ( ६ ) मे. असि. रजिस्ट्रारसाहेब को. सो. यांचेकडून लँड मॉर्गेज को. क्रे. सो. लि. ला सूट देण्याबाबत कामांचा विचार (७) पुढील वर्षाकरितां बँकेचा हिशेब तपासनीस नेमणें व त्यांचें वेतन ठरविणें (८) चालूं वर्षांत बँकेनें घ्यावयाची जबाबदारी ठरविणें ( ९ ) इतर व आयत्या वेळचीं कामें;

सर्व भागीदारांनीं सभेस अगत्य यावें अशी विनंति आहे.

संचालक मंडळाच्या आज्ञेवरून

फलटण, श्री. ह. तळवलकर,
दि. ८-९-१९५२. व्यवस्थापक

## शेतमजुरांच्या परिस्थितीसंबंधीं माहिती

भारत सरकारच्या मजूर खात्यानें राज्य सरकारांच्या निकट सहकार्यानें कांहीं दिवसांपूर्वी हातीं घेतलेल्या बहुधा सर्वांत मोठ्या अशा सामाजिक व आर्थिक पाहाणीचें काम आतां पुरें झालें आहे. ही पाहाणी देशांतील शेतमजुरांच्या परिस्थितीसंबंधी होती.

शेतमजुरांच्या परिस्थितींत सुधारणा करण्यासाठी १९४८ च्या मिनिमम् वेजेस ॲक्टान्वयें किमान वेतन निश्चित करण्यासुद्धां इतर कोणत्या उपाययोजना करतां येतील यावर विचार करण्याचे हेतूनें काम, उत्पन्न, खर्च, राहाणीमानाचा दर्जा व कर्ज यासंबंधी माहिती मिळविणें हा या चौकशीमागील हेतु होता. ही चौकशी भारतांतील सर्व राज्यांत तसेंच जम्मू व काश्मीरमध्येंही करण्यांत आली. शेतमजुरांच्या परिस्थितींत अखिल भारतीय प्रमाणावर आतांपर्यंत कोणतीही चौकशी करण्यांत आली नसल्यानें, मंत्रिमंडळ सचिवालयाच्या नियंत्रणाखालीं स्थापन झालेल्या अर्थशास्त्रज्ञ व आंकडेवारी तज्ज्ञांच्या खातें समितीनें अशी शिफारस केली कीं, शेतमजुरांच्या चौकशीचें काम हळुहळु वाढणाऱ्या अवस्थांतून केलें जावें आणि प्रश्नावलींची चांचणी करणें, नमुन्यासाठी माहिती जमविणें, कामास लागणाऱ्या वेळाचा अंदाज घेणें व प्रत्यक्ष कामास लागणाऱ्या संघटनेचें स्वरूप ठरविणें, इत्यादींसाठी कांहीं राज्यांतील कांहीं खेड्यांतून प्राथमिक चौकशी ही या कामाची पहिली अवस्था असावी

या शिफारशींचा स्वीकार करण्यांत येऊन जून ते नोव्हेंबर १९४९ पर्यंत म्हैसूरमधील एक, आसाम, ओरिसा व मध्यप्रदेश या राज्यांत प्रत्येकीं दोन, मद्रासेंतील तीन, बिहारांतील चार, पश्चिम बंगालमधील पांच व उत्तरप्रदेश राज्यांतील आठ अशा एकूण २७ खेड्यांची प्राथमिक चौकशी करण्यांत आली. प्रत्येक राज्यांतील एक याप्रमाणें अशा आठ खेड्यांतील शेतमजुरांच्या परिस्थितीवरील अहवाल यापूर्वीच प्रसिद्ध करण्यांत आले आहेत.

### रँडम सॅम्प्लिंग

मनुष्यबळ, पैसा व वेळ यांच्या मर्यादित साधनांमुळें या देशांतील सर्वच्या सर्व ५,६०,००० खेड्यांची चौकशी करणें शक्य नव्हतें. त्यामुळें रँडम सॅम्प्लिंगच्या तत्त्वावर निवडलेल्या ८१३ खेड्यांपुरतीच अशी चौकशी करण्याचें ठरलें. ही चौकशी करण्याची मुदत एक वर्षाची होती व ती तीन अवस्थांतून केली गेली आणि गोळा केलेली माहितीही त्याच कालांतील होती. खेड्यांतील सर्वसाधारण आर्थिक परिस्थिति आणि रोजगारांचें स्वरूप यासंबंधीं माहिती मिळविणें हा पहिल्या दोन अवस्थांचा मुख्य हेतु होता. इतर कुटुंबपाहणीसाठी शेतमजूर म्हणतां येतील अशीं कुटुंबें ठरविण्याचें काम तिसऱ्या अवस्थेंत केलें जाणार होतें. एकाद्या कुटुंबांतील कर्ता अगर मिळवित्या लोकांपैकीं ५० टक्के वा त्याहून अधिक माणसांनीं शेतमजुरी हाच आपला मुख्य व्यवसाय दिल्यास त्या कुटुंबास शेतमजुरांचें कुटुंब असें ठरविण्यांत आलें. याप्रमाणें हीं कुटुंबें निराळीं काढल्यानंतर चौकशीच्या तिसऱ्या अवस्थेसाठी त्यांतील कांहींची निवड करण्यांत येत असे. अशा रीतीनें चौकशीच्या पहिल्या दोन अवस्थांत खेडें व तिसऱ्या अवस्थेंत हें शेतमजुरांचें कुटुंब, नमुनापाहणींचें परिमाण होतें.

राज्य सरकारें, अर्थशास्त्रज्ञ आणि या विषयावरील तज्ज्ञ यांचेशीं विचारविनिमय करून एक व्यापक प्रश्नावली तयार करण्यांत आली. या प्रश्नावलीचे तीन भाग होते. पहिल्या भागांत खेड्याची सर्वसाधारण आर्थिक परिस्थिति, जमीन महसुलाची पद्धति, जमिनीचा वापर, मजुरीचे दर, मजुरी देण्याच्या पद्धती, महत्त्वाच्या वस्तूंच्या घाऊक व किरकोळ किंमती आणि बाहेरील मजूर यासंबंधी माहिती गोळा करावयाची होती. दुसऱ्या भागांत, निवडलेल्या खेड्यांतील कुटुंबांस मिळणारें काम, त्यांचें आकारमान, उत्पन्नाची कुवत, घरें, शेताचें आकारमान, भाड्यानें आणलेल्या मजुरांचें प्रमाण, गुरेंढोरें व अवजारें याविषयीं माहिती मिळविण्याकरितां तयार केला होता; तर तिसरा भाग अशा कुटुंबांतील रँडम सॅम्प्लिंग पद्धतीनें निवडलेल्या कांहीं कुटुंबांचें एकंदर व निव्वळ उत्पन्न, राहाणीमानाचा दर्जा, खर्च व कर्ज इत्यादींवरील माहिती मिळविण्याकरितां तयार केला होता

### सर्वसाधारण तक्ते

एकूण ८१३ खेड्यांतील माहितीपत्रकें जमविण्यांत आलीं. या पत्रकांतील माहिती काळजीपूर्वक तपासण्यांत आली आणि मजूर व त्याच्या आंकडेवारी विभागांत ती तक्तेवार मांडण्यांत आली. प्रत्येक राज्याकरितां व विभागाकरितां १६ तक्ते तयार करण्यांत आले.

प्रत्येक राज्यांतील अशा निवडक कुटुंबांच्या पेशानुसार विभागणीचें पृथक्करण केल्यानंतर या अहवालांत कुटुंबांचें मालक, कूळ, शेतमजूर व शेती न करणारे असे चार मुख्य गट पाडण्यांत आले आहेत. सर्व राज्यांतील कुटुंबांचा विचार करतां शेतकी करणारीं कुटुंबें व इतर कुटुंबें यांचें प्रमाण अनुक्रमें ७७·७ व २२·३ टक्के पडलें तर मालक, कूळ, शेतमजूर व शेती न करणारे यांचें प्रमाण अनुक्रमें २६·५, २३·१, २८·१ व २२·३ टक्के पडलें. स्वतःची जमीन असलेल्या व नसलेल्या शेतमजुरांच्या कुटुंबांचें प्रमाण अनुक्रमें १६·१ व १२·० टक्के पडलें.

या प्रमाणाच्या आधारावर या देशांतील खेड्यांत शेतमजुरी करणाऱ्या कुटुंबांची एकूण संख्या १८७ लक्ष अगर एकूण ग्रामीण विभागांतील कुटुंबांच्या २७ टक्के होते असा अंदाज या अहवालांत दिला आहे. तसेंच खेड्यांतील प्रत्येक कुटुंबांत सरासरी पांच माणसें असतात, असेंही त्यांत म्हटलें आहे.

### रोजगारीची–परिस्थिति

शेतकऱ्यास आपल्या जमिनीवर काम करण्यासाठी लागणाऱ्या मदतीच्या प्रसंगानुसार शेतमजुरांचे मुख्य विभाग पडतात. शेतकऱ्याच्या शेताचें क्षेत्रफळ मोठें असल्यास सतत चालू असलेल्या शेतीच्या निरनिराळ्या कामांसाठी म्हणून कायमच्या माणसांची गरज, ही मदत त्यास कोणत्याही वेळीं मिळाली पाहिजे. त्याशिवाय पिकें आल्यानंतर तीं वाढण्याच्या हंगामांत त्यास अधिक मदतीची आवश्यकता भासते. तसेंच पिकांची कापणी करण्याची वेळ आल्यावर त्यास हरतऱ्हेची मदत लागते. त्या वेळीं तो मोठ्या उत्सुकतेनें जादा मजूर मिळवूं पाहातो आणि अशा कामांसाठी पुढें येणाऱ्या सर्वांस काम देण्याकडे त्याचा कल असतो, असें या अहवालांत नमूद केलें आहे.

यावरून असें दिसून येईल कीं, शेतावरील कामाच्या जरूरीनुसार कायम, हंगामी अगर तात्पुरत्या शेतमजुरीचें काम उद्भवतें. मजुराशी वेळाचा करार करून, त्यास राहाण्यास जवळपास जागा देऊन कायम स्वरूपाची मदत आणि त्याचा व त्यावर अवलंबन असलेल्यांचा फायदा करून, देणारे रीतीरिवाज व परंपरागत व्यवहार पाळून त्याची सदिच्छा मिळविण्यांत येते.

इतकेंच नव्हे, तर अनेक दैनंदिन व्यवहार व शेतीच्या पद्धतींत आणि इतर बाबतींतही चालीरीती हाच शेतकी लोक-

संस्थेच्या निरनिराळ्या गटांत संबंध ठेवणारा अत्यावश्यक मार्गदर्शक आहे. या चालिरीतींनींच शेतकऱ्यांत पिढ्यानुपिढ्या वैशिष्ट्यपूर्ण असें स्थैर्य निर्माण करून तें टिकविलें जातें. मालक व नोकर यांच्या करारांतील ठिकठिकाणची भिन्नता, मजुरी देण्याच्या पद्धती, मजुरांस मिळालेले परंपरागत हक्क इत्यादी सर्व गोष्टी म्हणजे हजारों वर्षांच्या अनुभवाचा परिपाक आहेत आणि या चालीरीती फायदेशीर नसल्या तरी शेतकी सुधारणेच्या कोणत्याही योजनेंत त्याचें महत्त्व मान्य करावेंच लागतें.

### किमान वेतन निश्चिती

पंजाब, दिल्ली, कच्छ, बिलासपूर, बिहार ( पाटणा जिल्हा ), हिमाचल प्रदेश व अजमीर या ठिकाणीं आतांपर्यंत शेतमजुरांचे किमान वेतनाचे दर निश्चित झाले आहेत. ओरिसा, कुर्ग, राजस्थान व विंध्यप्रदेश राज्यांनीं याबाबतचे कच्चे मसुदे प्रसिद्ध केले आहेत. उत्तर प्रदेश, आसाम, मध्यभारत व पेप्सु येथील सरकारांनीं १९४८ च्या मिनिमम वेजेस ॲक्टानुसार आपल्या राज्यांत शेत-मजुरांच्या किमान वेतनाची निश्चिती करून त्यावर शिफारशी सादर करण्याकरितां समित्यांची नेमणूक केली आहे. यांतील उत्तर प्रदेश व आसाम राज्यांच्या समित्यांनीं आपले अहवाल सादर केले असून त्यांनीं केलेल्या शिफारशींवर तेथील सरकारें विचार करीत आहेत.

---

**चीनला सीलोनचें रबर**—सीलोनमधून २,१०० टन रबर घेऊन चीनला पोंचविण्यासाठी पोलंडची एक बोट कोलंबो बंदरांत आली आहे. दुसरी एक पोलंडची बोट १,९०० टन सीलोनी रबर घेऊन चीनला जाणार आहे. ही दुसरी बोट २० सप्टेंबरला कोलंबोला येईल.

**पाकिस्तान जपानी यंत्रें घेणार**—पाकिस्तानचें सरकार जपानकडून ५०,००,००० डॉलर्स किंमतीची कापडाच्या गिरणीची यंत्रसामुग्री घेणार आहे असें समजतें. पाकिस्ताननें आपल्या उद्योगधंद्यांच्या विस्ताराची जी योजना आंखली आहे ती पूर्ण होण्यास निदान पांच वर्षें तरी लागतील. पाकिस्तानला तागाच्या गिरणीचीं यंत्रें आणि पायमोजे-हातमोजे विणण्याचीं यंत्रेंही पाहिजे आहेत.

**भंग्यांच्या वसाहतीसाठी रक्कम**—जबलपूरच्या कॉर्पोरेशननें भंग्यांना घरें बांधून देण्यासाठी ५०,००० रुपयांची रक्कम मंजूर केली आहे. १९४९ सालीं ह्याच कामासाठी २६,००० रुपयांची रक्कम बाजूला काढून ठेवण्यांत आली होती. परंतु जागेच्या अभावीं हा प्रश्न अर्धवट सोडून द्यावा लागला होता.

**ऑईल एंजिन्सचा कारखाना**—कलकत्त्याजवळील हिंदुस्थान मोटार्स कारखान्याला बाजारांतील मंदीमुळें बराच धक्का बसला. त्यामुळें कारखान्यांतून बऱ्याच कामगारांना काढून टाकण्यांत आलें होतें. आतां ह्या कारखान्यांत १० अश्वशक्तीचीं डिझेल एंजिन्स तयार करण्यांत येणार आहेत. दर महिन्याला ५०० एंजिन्स बनावलीं जाणार आहेत.

**मुंबईला औद्योगिक पदार्थ संग्रहालय**—मुंबईतील प्रिन्स ऑफ वेल्स म्युझिअमचे ट्रस्टी शहरांत एक औद्योगिक पदार्थ-संग्रहालय स्थापन करण्याचा विचार करीत आहेत. भारताच्या मुख्य उद्योगधंदेविषयक कारखान्यांचे नमुने संग्रहालयांत ठेवण्यांत येतील असें समजतें सध्यां फक्त पुण्यालाच असा म्युझियम आहे.

### पुणें जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ लि.

ह्या संघाच्या व्यवहारांत गेल्या वर्षीं ४४½ लक्ष रुपयांची वाढ झाली. एकूण व्यापारी उलाढाल १ कोटि, १३ लक्ष रुपयांची झाली. संघानें कापड, सूत, लोखंड, सिमेंट, पेंड व मिश्र खत, बटाटा बियाणें व बटाटा मिश्रण खत, सल्फेट ऑफ अमोनिया, शेतीचीं अवजारें वगैरे मालाचा पुरवठा केला. संघाच्या नव्या इमारतीचें उद्घाटन मंत्रि श्री. न. वि. गाडगीळ ह्यांच्या हस्तें ६-४-१९५२ रोजीं झाला. इमारतीचे मागील बाजूस सरकारकडून अक्वायर करून घेतलेल्या जागेवर शेतकऱ्यांच्या शेतीचा माल साठवण्यासाठी गोडाऊन बांधण्याचें काम हातीं घेण्यांत आलें आहे. संघास ४९,४६६ रु निव्वळ नफा झाला. शेअर्सवर ६¼ डिव्हिडंडसाठी २,६०६ रु. योजले आहेत. बाकी बहुतेक सर्व रक्कम रिझर्व्ह फंड, इमारत फंड, शिक्षणप्रचार फंड, मार्केट डेव्हलपमेंट फंड, नोकर आपत्ति निवारण फंड, इत्यादींची मजबुती वाढविण्याकडे उपयोगांत आणली जाईल. ( चेअरमन : य. द. सोले, व्हा. चेअरमन : द. ग. टिळेकर, मॅनेजर : ना. द. कुलकर्णी )

---

### दि बार्शी सें. को. बँक लि.

शेअर भांडवल, एकूण ठेवी, दिलेलीं कर्जें, निव्वळ नफा, एकूण व्यवहार, ह्या सर्व बाबतींत वरील बँकेनें चांगली प्रगति दाखविली आहे. पांच वर्षांपूर्वी बँकेचा व्यवहार ५१ लक्ष रु. होता; गेल्या वर्षीं तो १ कोटी रु. वर झाला. ह्या मुदतींत शेअर भांडवल ९५ हजारांवरून १ लक्ष, १३ हजार रु. झालें. स्थानिक मिल्स व बँका ठेवीदारांस जादा व्याजाचे दर देत असूनहि, बार्शी सें. को. बँकेवरील ठेवीदारांचा विश्वास कायम आहे, ही गोष्ट चालकांना भूषणावह आहे. सोसायट्यांच्या व्यवहारांस प्राधान्य देण्याचें धोरण योग्यच आहे. लांब मुदतीचीं कर्जें देण्यासाठी ह्या बँकेस एजन्सी देऊन तिचे मार्फतच ह्या तालुक्यांत कर्जें वाटण्याच्या योजनेस सरकारी मान्यता मिळाली आहे. अनपेक्षित बाजारमंदी आली, तरी माल तारण कर्जांत बँकेस एका पैचेंहि नुकसान आलें नाहीं. बँक स्थापनेपासून "अ" वर्गांत आहे. गेल्या वर्षीं बँकेस निव्वळ नफा १५,४३९ रु. झाला. ६¼% डिव्हिडंड देण्यांत येईल, त्यास ७,०५० रु. लागतील. ( चेअरमन : माधव विष्णू विश्वरूपे, बी. एससी., एलएल्. बी. व्हा. चेअरमन : रामचंद्र गोविंद परंडकर. ॲ. मॅनेजर : विश्वनाथ एकनाथ रेडे ).

---

### दि महाड अर्बन को. बँक लि

गेल्या वर्षीं बँकेची शेअर विक्री ज्यास्त जोरांत झाली. मंदीच्या काळांत बँकेनें सभासदांच्या सोईकडे ज्यास्त लक्ष पुरविलें व हुंडी कर्जद्वारा व्यापारी वर्गाला जरूर ती मदत केली. त्यामुळें बँकेचा नफा वाढून तो २०,८१४ रु. झाला. ठेवींत गुदस्त सालाप्रमाणें अहवालाचे वर्षींहि वाढच झाली. कापड खात्यांत, धंद्याचें मान कमी होऊनहि, २२,०४५ रु. नफा झाला. त्याचा विनियोग मुख्यतः बँकेचे फंडस वाढवण्याकडे केला जाणार आहे कापड वाटप कामाचे बाबतींत बँकेचे सन्मान्य सभासद श्री. मु. गो. टिपणीस ह्यांच्या प्रोत्साहनाबद्दल व मदतीबद्दल बोर्डानें आभार मानले आहेत. बँकेचा एकूण ताळेबंद १०¼ लक्ष रुपयांचा आहे ( चेअरमनः दत्तात्रय नरहर वैद्य, बी. ए., एलएल. बी. व्हा. चेअरमन : अनंत शंकर जोशी. आ. मॅनेजिंग डायरेक्टर : वि. गो. मेहता बी. ए., एलएल. बी. मॅनेजर : मा. गो. धारप, बी. एससी., एच. डी. सी. )

## धूतपापेश्वर इंडस्ट्रीज्, लिमिटेड

कंपनीच्या शेअर होल्डर्सच्या तिसऱ्या साधारण सभेचे प्रसंगीं ता. ९ सप्टेंबर १९५२ रोजीं धूतपापेश्वर प्रासाद, मुंबई येथें झालेलें, कंपनीचे चेअरमन—

श्री. पु. ब. ऊर्फ दादासाहेब गोळे, बी. ए., एलएल. बी., यांचें भाषण

सन १९५१ सालीं सुमारें दोन लाखांनीं विक्रीमध्यें वाढ झाली आहे. अर्थात खर्चांतहि वाढ झालेली आहे. स्टॉक-इन-ट्रेड १९५० पेक्षां सुमारे एक लाखानें वाढला आहे. कारखान्याच्या इमारती व यंत्रसामुग्री यांतहि थोडी वाढ झाली आहे. औषधी-निर्मितीसाठी बाष्पशक्तीचें साहाय्य घेण्याची योजना पूर्वींच ठरली होती, त्यासाठी जरूर ती प्राथमिक तयारी वृत्तांत वर्षांत करण्यांत आली, व आतां ती योजना अंमलांतहि आली आहे. बॉयलरप्रमाणें दुसरीहि बरीच यंत्रसामुग्री सुधारणें, वाढविणें किंवा नवीन घेणें क्रमप्राप्त होणार आहे. हें लक्षांत घेऊन गेल्या वर्षी आपण प्लँट व् मशीनरी यासाठीं रिझर्व फंड सुरू केला आहे. या वर्षी पांच हजार रुपये या फंडाकडे देण्याची शिफारस डायरेक्टर्सनीं केली आहे.

धंद्याचे विविध गरजांसाठीं कंपनीस भांडवलाची गरज आहे. यास्तव वृत्तांत वर्षांत पांच लाखांचे नवीन शेअर्स विक्रीस काढले आहेत, ते हळुहळु खपत आहेत. हल्लींच्या शेअरहोल्डर्सनीं मनांत आणल्यास या बाबतींत त्यांची पुष्कळ मदत होऊं शकेल.

### आयुर्वेदाला ऊर्जित काळाची अपेक्षा

स्वराज्यप्राप्तीपासून आयुर्वेदाला ऊर्जितकाळ येण्याची आशा आपण बाळगून आहोंत. उत्तर प्रदेश, राजस्थान, सौराष्ट्र आणि त्रावणकोर या राज्यांत डायरेक्टर ऑफ आयुर्वेद हे नवीन अधिकारी नेमले गेले आहेत. आपल्या मुंबई राज्यांतहि असे अधिकारी नेमले जातील अशी आशा बाळगण्यास हरकत नाहीं. कारण या नेमणुकीनें आयुर्वेदहिताचा स्वतंत्र विचार होण्याची शक्यता निर्माण होईल

आयुर्वेदीय औषधांवर आणि त्यांतहि धूतपापेश्वर औषधांवर बहुसंख्य समाजाची श्रद्धा आहे. खाजगी उपयोगाकरितां औषधांच्या किंमतीपेक्षां दर्जाकडे अधिक पाहिलें जातें, परंतु सरकारी किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांनीं चालविलेल्या संस्थांमधून किंमतीकडे अधिक लक्ष पुरविलें जातें, असा कित्येक ठिकाणीं अनुभव येतो. यांत सुधारणा होणें इष्ट आहे.

### दुरुपयोग होणारीं टिंक्चर्स

मुंबई सरकारनें दारूबंदीच्या कायद्यान्वयें द्राक्षासव इ. च्या निर्मितीवर निर्बंध घातले, त्यावेळीं सरकारची अशी कल्पना होती कीं दारूऐवजीं द्राक्षासवाचा उपयोग लोक करण्याचा संभव आहे. परंतु आतां अनुभवानें असें सिद्ध झालें आहे कीं, तसें संभवनीय नाहीं आणि द्राक्षासवाचा खप वाढलेला नाहीं. ही गोष्ट आकड्यांनींशीं सरकारचे नजरेस आणण्यांत आली आहे आणि, दारूबंदीच्या नवीन धोरणामुळें औषधांमधील अल्कोहोलचें प्रमाण नैसर्गिकरीत्या उत्पन्न झालेलें म्हणजेच १२ टक्के यापेक्षां अधिक नाहीं. दारूऐवजीं ज्यांचा उपयोग होण्याचा संभव नाहीं अशीं औषधें दारूबंदीच्या धोरणाच्या अंमलबजावणींमधून वगळण्यांत येणार आहेत, असें ड्रग्ज ॲक्टमध्यें नवीन केलेल्या सुधारणांवरून दिसतें. तें बरोबर ठरल्यास आयुर्वेदीय आसवारिष्टें निर्बंधमुक्त होतील असें दिसतें.

द्राक्षासव तयार करणं असेल तर बाँडेड लॅबोरेटरी चालविली पाहिजे, असें सरकारी धोरण ठरल्यामुळें आपणांस बाँडेड लॅबोरेटरी सुरू करावी लागली. द्राक्षासवाचा खप, बाँडेड लॅबोरेटरीचा खर्च सोसण्याइतका नसल्यामुळें आणि अनेक विक्रेत्यांची तशी सूचना असल्यामुळें आपण बाँडेड लॅबोरेटरी-मध्येंच तयार होणारीं टिंक्चर्स वगैरे औषधें तयार करण्यास सुरवात केली, परंतु त्यांची विक्री करतांनाहि टिंक्चर झेंजीबीरीस-सारखीं टिंक्चर्स सर्रास विकण्याचें धोरण ठेविलें नाहीं. यामुळें टिंक्चर झेंजीबीरीसचा दुरुपयोग झाला असल्यास त्या दोषामध्यें आपण सहभागी ठरणार नाहीं. निरनिराळ्या कारखान्यांमध्यें सालोसाल टिंक्चर झेंजीबीरीस किती तयार झालें, अशा माहितीचा तक्ता मणसाळी रिपोर्टामध्यें दिलेला आहे. त्यांतील आकड्यांशीं तुलना केल्यास मी म्हटलेली गोष्ट कोणासहि पटेल. दुसरीं टिंक्चर्स अमुक प्रमाणांत घेतल्याशिवाय टिंक्चर झेंजीबीरीससारखीं टिंक्चर्स विक्रेत्यांना मुळींच मिळणार नाहींत असा नियमच आपण केला होता.

आसवारिष्टांप्रमाणेंच अफू आणि भांग यांचे औषधी उपयोगा-संबंधींचे सरकारी निर्बंध गैरवाजवी भासण्याइतके कडक आहेत. त्यामुळें त्या द्रव्यांपासून बनणारीं औषधें तयार करणें व तीं विकणें अशक्यप्राय झालें आहे आणि त्यामुळें ती गरज भाग-विण्याकरितां गिऱ्हाईक पाश्चात्य वैद्यकाकडे वळत आहेत.

### कामगारांचा प्रश्न

आजकाल सगळीकडेच कामगारांचा प्रश्न धंद्यांतील इतर बाबींप्रमाणेंच गुंतागुंतीचा होऊन बसला आहे. आपल्या कार-खान्यांमध्यें मिळणारें वेतन आणि सवलती या आपल्यासारख्या दुसऱ्या कारखान्यांमध्यें किंवा पनवेल शहरामध्यें अन्यत्र मिळणाऱ्या वेतनांशीं आणि सवलतींशीं तुलना करतां कमी नाहींत; जास्तीच आहेत. गेल्या दोन वर्षांचे काळांत कामगार युनियनबरोबर बोलणीं होऊन किमान मजुरी, त्यामधील वाढ, रजेचे दिवस, महागाई-भत्त्याचें प्रमाण, गेल्या दोन वर्षांचा बोनस या बाबतींमध्यें वाद उरला नाहीं. आतां सर्वत्र मंदीची लाट येत आहे. अशा वेळीं गेल्या वर्षी ठरलेलीं प्रमाणें केवळ ठरावाची मुदत संपली म्हणून बदलणें योग्य नाहीं, हें ध्यानांत घेतल्यास कामगारविषयक प्रश्न सुटण्यास सोपे आहेत. परंतु नुकत्याच झालेल्या तडजोडीचे प्रयत्नांमध्यें कंपनीचे उत्तराचे पूर्वींच युनियननें तडजोडीमधील बोलण्यांतील सूचनांस नकार दिलेला आहे आणि औद्योगिक कोर्टाचाच निर्णय या बाबतींत घ्यावा लागेल असें दिसत आहे, ही निरुपायाची गोष्ट आहे. औद्योगिक कोर्टाचा निर्णयहि कांहीं कामगारसंस्था मानीत नाहींत असा अनुभव नुकताच विमान कंपनीच्या कामगारांच्या बाबतींत आल्याचें वृत्तपत्रांवरून दिसतें. आपल्या कारखान्यांतील वातावरण इतरत्र आढळणाऱ्या कित्येक ठिकाणच्या वातावरणापेक्षां सलोख्याचें आहे. तें तसेंच राहील, व कांहीं मतभेद आजच्या परिस्थितींत दिसत असले तरी ते लव-करच शिल्लक राहाणार नाहींत अशी मी आशा करतों. या बाबतींत कंपनी आपल्या बाजूनें करतां येण्यासारख्या गोष्टी कर-ण्यास केव्हांहि तयार असते.

---

**जपानी मुलांची अमेरिकेंत सोय!**—जपानमधील अमेरि-कन सैनिक सुमारें १,००,००० अर्भकांच्या जन्मास कारणी-भूत झाले. ह्या अनाथ मुलांची सोय अमेरिकेंत करण्याच्या प्रयत्नासाठी एका जपानी मुत्सद्यांची बायको अमेरिकेला गेली आहे.

## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, पुणें.

१९५२-५३ चे बोर्ड ऑफ डायरेक्टर्स.

१. मा. रामचंद्र यशवंत बोरकर, एल. एस. जी. डी. चेअरमन.
२. मा. गोटिराम पांडुरंग पवार, व्हा. चेअरमन, (पुरंदर, भोर व बेल्हे महाल भाग)
३. मा. दगडू बाबाजी तुपे, (हवेली, मुळशी, मावळ व पुणें शहर भाग).
४. मा. कृष्णाजी गेनूजी पाटील, (दौंड भाग).
५. मा. रामचंद्र बाबूराव शेंडकर, (शिरूर आंबेगांव भाग).
६. मा. महादेव दगडू शेटे, (खेड भाग).
७. मा. प्रतापराव बळवंतराव सूर्यवंशी, (इंदापूर भाग)
८. मा. पांडुरंग तुकाराम वदक, (बारामती भाग).
९. मा. लक्ष्मण हरीभाऊ बुट्टे पाटील. (जुन्नर भाग).
१०. मा. सदाशिव वामन कुलकर्णी, (पुणें शहर बिगर शेतकी सोसायट्या)
११. मा. यमाजी खंडुजी पवार, (पुणें जिल्हा बिगर शेतकी सोसायट्या).
१२. मा. गणेश रघुनाथ तुळशीबागवाले,
१३. मा. शंकर नीलकंठ अभ्यंकर,
१४. मा. विश्वनाथ जनार्दन करंदीकर,
१५. मा. श्रीपाद रामचंद्र पाळंदे,
१६. मा. गणेश नरहर जेजुरीकर,
१७. मा. द्वारकानाथ केशव जोशी,
१८. मा. मो. वि. रबडे, (मॅनेजिंग डायरेक्टर, पदसिद्ध).

---

## महाराष्ट्र सहकारी विद्यालय, पुणें १

—जून १९५२ को. ऑ. डिप्लोमाचा रिझल्ट—

**प्रथम श्रेणी**

(१) देवराम कचरू नेहते (२) पांडुरंग दौलत पाटील.

**द्वितीय श्रेणी**

(१) श्री. ज. दामले (२) बा. रा. देसाई (३) ह. ना. काळे (४) स. ना. कोलवार (५) म. ग. कुलकर्णी (६) कृ. के. पाटक (७) भा. भा. पाटील (८) द. पा. पाटील (९) दा. य. पाटील (१०) निं. ना. पाटील (११) रा. ता. पाटील (१२) रा. मा. पाटील (१३) दे. दे. शिंदे (१४) वे. न. तेली (१५) रा. श. ताम्हणे (१६) ना. ज. उपासनी.

**तृतीय श्रेणी**

(१) मो. बा. बागेवाडी (२) सं. ग. चिवटे (३) श्री. वि. देसाई (४) शं. का. देवरे (५) सि. मु. धारपुरे (६) व. न. जोशी (७) शं. ना. पाटील (८) द. रा. पवार (९) श्री. भि. पुरंदरे (१०) वि. रा. साने.

---

**भावनगर येथील मीठ-संशोधन केंद्र**— भावनगर येथें मिठाच्या संशोधनाचें एक केंद्र उघडण्याची तयारी झपाट्यानें चालू आहे असें समजतें. भारतांत सध्यां स्वतःपुरतें मीठ तर तयार होतेंच पण बरेंच मीठ निर्यातही करण्यांत येतें. पण शास्त्रीय संशोधनानें आणि सुधारलेलें उत्पादनाचें तंत्र वापरून मिठाचा दर्जा सुधारणें मात्र आवश्यक आहे.


## बँक ऑफ पूना लि.

(शेड्यूल्ड बँक)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल : | ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें : | २५,००,००० |
| वसूल भांडवल : | १२,५०,००० |

**—संचालक मंडळ—**

१ श्री. मुरलीधर चतुर्भुज लोया, चेअरमन.
२ श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, जे. पी.
३ डॉ. नारायण भिकाजी परुळेकर M. A. Ph. D. संपादक, सकाळ, पुणें.
४ श्री. फ्रामजी पी. पोचा, बियांचे व्यापारी.
५ श्री. नारायणदास श्रीराम सोमाणी
६ श्री. गणपतराव काळूराम नाईक, B. SC., B. E., LL. B.

शाखा—(१) भवानी पेठ, पुणें. (२) सदाशिव पेठ, पुणें. (३) कोल्हापूर (४) सांगली.

व्याजाचे दर–चालू ठेव १/२ टक्का. सेव्हिंग्ज १॥ टक्का.

मुदत ठेव : १ वर्ष ३ टक्के, ५ वर्षे ४ टक्के.

एक वर्षापेक्षां कमी मुदतीच्या ठेवींवर आकर्षक व्याज.
मुख्य ऑफिस व सांगली शाखेंत लॉकर्सची सोय.

मुख्य ऑफिस : ४५५ रविवार, पुणें २. गो. गं. साठे, मॅनेजर.

## दि रत्नाकर बँक, लि.

(कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली)

स्थापना : १९४३

मुख्य कचेरी: भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

शाखा—सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ५,०३,००० |
| रिझर्व्ह फंड | ... | ५१,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४७,६६,००० |

—यच्चावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील, सांगली, चेअरमन
श्री. गंगाराम सिद्दाप्पा चौगुले, कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा, B. COM., C. A. I. I. B. मॅनेजर


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ ' आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें